# महिला अत्याचारावर विचारवंतांची भूमिका : एक सामाजिक अध्ययन

**डॉ.देवमन श्रीकृष्ण उंबरकर**
समाजशास्त्र विभागप्रमुख, सहयोगी प्राध्यापक
स्व. वसंतराव कोल्हटकर कला महाविद्यालय,
रोहणा. ता.आर्वी. जिल्हा वर्धा

---

***सारांश :***

*आपल्या समजत महिलांना केवळ दुय्यम वागणूक दिली जाते असे नव्हे तर, त्यांच्यावर विविध प्रकारचे अत्याचार केले जातात. या अत्याचाराची व्याप्ती अतीशय मोठी आहे. अनेक रूपाने हे अत्याचार घडत असतात. ते जसे श्शारीरीक व मानसीक स्वरूपाचे आहेत, तसेच वैयक्तिक, कौटुंबिक व सामाजिक स्वरूपाचे आहेत. त्यामुळे स्त्रियांवरील अत्याचाराच्या प्रकारांची गणती करनेही कठीन झालेले आहे. पतीकडून पत्नीला होणारी मारहान, पत्नीचा केला जणारा श्शारीरिक व मानसीक छळ, नवविवाहीत तरूणीचा हुंड्यासाठी होत असलेला छळ आणि त्यातून घडणारे हुंडाबळी, स्त्रियांचे अपहरन, बलात्कार, विनयभंग, लैंगीकछळ, अनैतीक कामात स्त्रियांना ढकलण्यासाठी त्यांचा केला जानारा व्यापार, कामाच्या किंवा नोकरीच्या ठिकानी होणारे स्त्रियांचे लैंगीक सोशन ही स्त्रियांवरील अत्याचाराची काही ठळक रूपे आपणास सांगता येतील.*

*महिलांचा काही केसमध्ये दोष नसतांनाही तिला या विक्षीप्त प्रकाराला समोर जावे लागते. रडणे, ओरडने, मदतीसाठी धावा करण्यासाठी विनविने, अत्याचार करणाऱ्यांच्या हातापाया पडणे, पण एवढे सारे करूणही जेंव्हा तिचा प्रतीकार संपतो तेंव्हाच ती खऱ्या अर्थाने संपते. तिचे सर्वकाही संपते. काय करावे?कोणाला सांगावे? घरच्यांना की बाहेरच्याना सांगावे? काय सांगावे? कोणाची मदत घ्यावी. अशा अनेक प्रश्नांची जी मालीका सुरू होते, ती थांबयचे नाव घेत नाही. बऱ्याचदा तर स्त्री स्वतालाच संपविते. जगातील एक तृतीयांश महिलांवर त्यांच्या नात्यातील किंवा अत्यंत जवळच्या लोकांकडून शारीरिक व लैंगीक अत्याचार केले जात असल्याचे संयुक्त राष्ट्राद्वारे करण्यात आलेल्या एका सर्वेक्षणात दिसून आले आहे.*

*पिता रक्षति कौमार्य, भर्ता रक्षति: यौवने।*
*पुत्रों रक्षति वार्ध्यक्ये, न स्त्री स्वातंत्र्यम् अर्हती ।।*

*म्हणजेच स्त्रीला बालपनी पिता, तारुण्यात पती आणि वृध्दावस्थेत पुत्रांच्या नियंत्रनात राहण्यासाठी विवश करण्यात आले. तसेच संकुचित विचारांच्या संकुचित वृत्तीला अथवा विचारातील दुष्कृत्याला मूलाधार समजून स्त्रियांवरील अण्याय—अत्याचार सुरू झालेत.*

*भारतीय संविधानाने कायदेशीर रीत्या स्त्री—पुरूष समानतेचे तत्व मान्य केले असलेतरी सांस्कृतीक जीवनात आणि व्यावहारीक जीवनात स्त्रियांचा दर्जा हा पुरूषांपेक्षा नेहमीच कनिष्ठ, आणि कमी प्रतीचा राहीलेला दिसून येतो. सर्वच धर्मीयांनी महिलांचे कार्यक्षेत्र हे स्वयंपाक घर व माजघरापुरतेच मर्यादीत ठेवले. समाजाची सांस्क्तीक व्यवस्था, मूल्यव्यवस्था याद्वारे समाजातील महिलांची स्थिती निर्धारीत होत होती. ' माझे वर्चस्वजर कायम आणि अबाधीत ठेवायचे असेल तर दुसऱ्यांचेदमन करने आवश्यकच असते' या मानसीकतेने महिलांवरील अत्याचारास सुरुवात झाली.*

**बीजशब्द** : हुंडाबळी, अपहरण, विनयभंग, लैंगिकछळ, महिला अत्याचार

---

**प्रस्तावना :**

भारतीय संविधानात महिलांच्या हक्कासंबंधी आणि त्यांच्या हितरक्षणासंबंधी अनेक महत्वाच्या तरतुदी करण्यात आल्या आहेत. आपल्या संविधानाच्या सरनाम्यातच सामाजिक, आर्थिक व राजकीय न्यायाची हमी देण्यात आली. राष्ट्रीय स्वातंत्र्याच्या आंदोलनाने स्त्री–पुरूष समानतेच्या मुल्याला विशेष महत्व दिले होते. त्यामुळे आपल्या घटनाकारांनीही या मुल्याचा योग्य तो आदर ठेवून महिलांच्या हक्कांचे रक्षन करण्यासाठी राज्यघटनेत अनेक तरतुदी करून ठेवल्या.

**मूलभूत हक्क** : भारतीय राज्यघटनेच्या तिसऱ्या भागात नागरीकांच्या मूलभूत हक्कांचा समावेश करण्यात आला. घटनाकारांनी मूलभूत हक्काची तरतूद करतांना स्त्री–पुरूष समानतेचे तत्व प्रमाण मानले आहे.

**समानतेचा हक्क** : भारतीय राज्यघटनेतील हा एक महत्वाचा हक्क होय. या हक्कात पुढील बाबी येतात, कायद्यापुढे समानता व कायद्याचे समान संरक्षण, भारतीय राज्यघटनेने अशी हमी दिली आहे की, प्रत्यक व्यक्ती कायद्यापुढे समान असेल व प्रत्येकाला कायद्याचे समान संरक्षन प्राप्त होईल.

**भेदभावाचा अभाव** : भारतीय राज्यघटनेत असे स्पष्टपणे म्हटले आहे की, राज्य नागरीकांमध्ये धर्म,वंश, जात,लिंग, जन्मस्थान यापैकी कोणत्याही आघारावर भेदभाव करनार नाही.

**संधीची समानता** : भारतीय घटनेने नागरीकांना संधीची समानता दिली असून त्या संदर्भात असे नमूद करण्यात आले आहे की, कोणत्याही नागरीकाला धर्म, वंश ,जात, लिंग, कुळ, जन्मस्थान, वास्तव्याचे ठिकान या किंवा यापैकी कोणत्याही एका कारनावरून राज्याच्या नियंत्रणाखालील पद मिळविण्यास अपात्र ठरविले जाणार नाही.

संविधानाने महिलांना एवढेसारे अधिकार देवूनही दरदिवसी महिलांवरील अत्याचाराच्या बातम्या वर्तमानपत्रामधून वाचायला मीळत आहे. एवढी समाजातील पुरूषांची मालसीकता खाली आलेली दिसून येत आहे.[१]

**महिला अत्याचाराचा अर्थ :**

महिलांवर होणारे अत्याचार ही एक गंभीर समस्या आहे. महिलांवर होणाऱ्या अत्याचाराचे स्वरूप एवढे गंभीर आहे की, त्याला व्याख्यांच्या चौकटीत बसविने अत्यंत अवघड आहे. तरीही काही विचारवंतांनी दिलेल्या व्याख्यांचा विचार पुढील प्रमाने करता येईल.

१) स्ट्रास च्या मते : महिला अत्याचार म्हणजे अशी क्रीया की ज्यास स्त्री ला जखमी करण्याची पुरुषाची उच्च प्रतीची क्षमता असते.

२) गेलेस च्या मते : छेडखानी अथवा अत्याचार म्हणजे पुरूष व्यक्तीची अशी कृती की जी स्त्रीला त्रास होइल, ती जखमी होईल हा हेतू डोळ्यासमोर ठेवून केली जाते. पण प्रत्यक्षात मात्र तसे करण्याचे टाळले जाते. म्हणजेच ठार मारण्याची , जखमी करण्याची धमकी देवून तिच्यावर जबरदस्ती करने होय.

३) डॉमेनॅच च्या मते : छळ अथवा अत्याचार म्हणजे एका व्यक्तीचे असे कृत्य की जे दुयऱ्या व्यक्तीच्या स्वातंत्र्यावर अक्रमन करते.[२]

थोडक्यात असे म्हणता येईल की, स्त्रियांच्या कामाच्या ठिकाणी त्या स्त्री आहे म्हणून दडपण आणनारे असूरक्षितता, भय व तनाव तयार करणारे व त्यांच्या कार्यक्षमतेवर विपरीत व प्रतीकुल परीनाम करणारे असे लैंगीक हेतूने प्रेरीत असलेले प्रत्यक्ष व सुचक वर्तन म्हणजे लैंगीक छड होय.

**राज्य महिला आयोग :**

महिला सबलीकरनाच्या व विकासाच्या कार्याला चालना देण्याच्या उद्देशाने महाराष्ट्र सरकारने जानेवारी

१९९३ मध्ये राज्य महिला आयोगाची स्थाचना केली. महिलेच्या प्रश्नांची दखल घेण्यासाठी अशा प्रकारचा आयोग स्थापन करनारे महाराष्ट्र हे देशातील पहिले राज्य होय. महिला विकासाच्या प्रश्नाला चालना देण्यासाठी आणि त्यांच्या विकासाच्या मार्गतील अडथडे दूर करण्यासाठी महाराष्ट्र सरकारने जून १९९४ मध्ये महिलांविषयक धोरन जाहिर केले. अशा प्रकारचे महिलांविषयक धोरन जाहिर करण्यातही महाराष्ट्राने संपूर्ण देशात आघाडी घेतली आहे.राज्य सरकार महिलांच्या विकासासाठी व कल्याणसाठी कोणकोणत्या योजना राबवू ईच्छीते आणि कोणकोणते उपक्रम हाती घेवू ईच्छिते याचा तपशील महिलांविषयक धेरनात देण्यात आला आहे. तसेच राज्य सरकारने या धोरनाच्या अंमलबजावणीसाठी काही महत्वपूर्ण पावूल उचलले आहे. हे सर्व महाराष्ट्र सरकारने करूनही आज राज्यामध्ये महिलांच्या संदर्भात देशात सर्वाधिक अत्याचार झालेला दिसून येत आहे. या परीस्थीतीला कोण्ती यंत्रना जबाबदार म्हणता येईल हेही अभ्यासने गरजेचे आहे.३

**संशोधनाची उद्‌दिष्टे :**

महिलांवर होणाऱ्या अत्याचाराचा अभ्यास करण्यासाठी काही उद्‌दिष्टे समोर ठेवून संशोधन करण्याचा प्रयत्न केलेला आहे, ती उद्‌दिष्टे पुढीलप्रमाने आहे.

१. महिला अत्याचारात वाढ होत आहे.

२. परिचीत व्यक्तीकडून महिलांवरील अत्याचारात वाढ होत असलेली दिसून येत आहे.

३. कायद्याची अंमलबजावनी योग्यप्रकारे होत नाही.

४. आई– वडीलांच्या संस्कारात कमतरता.

**संशोधनाची गृहितके :**

प्रस्तुत संशोधणासाठी खालिल गृहितकाची मांडणी केलेली आहे.

१. दिवसेंदिवस महिलांच्या अत्याचारात वाढ होत असलेली दिसून येत आहे.

२. कायदे राबविणारी यंत्रना प्रभावी काम करीत नाही?

३. न्यायालयाकडून शिक्षा करण्यास विलंब होत आहे.

४. महिलांवर अत्याचार करण्याची पुरूषांची उच्च कोटीची वासना.

**संशोधन पद्धती :**

प्रस्तुत संशोधनाकरीता वर्णनात्मक संशोधन आराखड्याचा उपयोग केलेला आहे.कारण की महिलांवरील अत्याचारात दिवसेंदिवस वाढत असलेला दिसून येत आहे. संपूर्ण भारतभर महिलांवर वेगवेगळ्या ठिकाणी अत्याचार होत असलेले दिसून येत आहे. म्हणून वेगवेगळ्या भागात पोहचू शकत नसल्यामुळे या आराखड्याचा उपयोग संशोधनाकरीता केलेला आहे. महिलांवरील अत्याचाराची माहिती दररोजच्या वर्तमानपत्रामधून वाचायला मीळत आहे.त्यामुळे या आराखड्याचा उपयोग संशोधनाकरीता चांगल्याप्रकारे होवू शकतो. या संशोधनाकरीता ग्रंथ, पुस्तके व वर्तमानपत्रांचा उपयोग केला जाईल.

**परिचितांकडून होतोय महिलांवर अत्याचार :**

एकिकडे सर्वच क्षेत्रात पुरूषांच्या बरोबरीने किंबहूना त्यांच्याहून सरस कामगीरी महिलांकडून होत असतांन राज्यात महिलांनर अत्याचार सुरूच आहे. विषेश म्हणजे बहूतांश पीडीतांना त्यांच्या महितीतील विकृतांकडून अत्याचाराला सामोरे जावे लागते. बलात्काराच्या गुन्यात तीन वर्षात पोलीसांनी १४०७७जणांना अटक केली आहे. विशेष म्हणजे त्यापैकी ९५ टक्याहून अधिक म्हणजे तब्बल १३७३२ आरोपी हे फिर्यादीच्या परिचितांपैकी आहेत. महिलांवर अत्याचार करणाऱ्यांपैकी काही नात्यातील तर काही मित्र मित्र असल्याची

माहिती तपासातून समोर आली आहे. केवड ३४५ जनांना पीडीता ओळखत नव्हत्या. बाकीचे सर्व पाहनीतीलच होते. काही आरोपी हे पीडीतांचे पूर्वाश्रमीचे मित्र होते. पण काही कारनास्तव त्यांच्यात वाद होवून त्यांनी सूड घेण्याच्या भावनेने बळजबरी केल्याचे पोलीस तपासातून स्पष्ट झाले.

| वर्ष | परिचित आरोपी | अज्ञात आरोपी |
|---|---|---|
| २०१६ | ४६२७ | १९२ |
| २०१७ | ४७८५ | ९४ |
| २०१८ | ४३२० | ५९ |
| एकूण | १३७३२ | ३४५ |

**बलात्काराच्या गुण्यातील अटकेतील आरोपी सारणी**

लोकमत न्यूज पेपर फरवरी२०२०

**महिलांवरील अत्याचाराचे सहा वर्षातील गुन्हे :**

राज्यात १ जानेवारी २०१४ ते ३१ डिसेंबर २०१९ या काळात विनय भंगाचे ७३ हजार ३१ गुन्हे दाखल. याच काळात बलात्काराचे २६५१२ गुन्हे दाखल झाले आहे. छेडछाड व हुंडाबळी चे अनुक्रमे ६४७५ व १४३० प्रकार घडले असून, त्यातील निम्याहुन अधिक प्रकरणाचा तपास सुरू आहे. राज्यात महिलांवरील अत्याचार सातत्याने वाढत असून, गेल्या सहा वर्षातील १ लाख ७ जहार ४४८ गंभीर गुन्हे दाखल झाले आहेत. बलात्कार, विनयभंग, हुंडाबळी, व लैंगिक छळासंबंधी दाखल गुन्यांची ही संख्या असून, प्रत्यक्षात त्याचे प्रमाण दीडपट अधिक असण्याची शक्यता पोलीस अधिकारी व्यक्त करीत आहे.

**राज्यात सहा वर्षा**तील **महिलांसबंधीचे गुन्हे**. सारणी

**दर दोन तासात एक बलात्कार, रोज ३४ विनयभंग** :

सुरक्षित व प्रगतीशील राज्य समजल्या जाणाऱ्या महाराष्ट्राची ओळख आता महिलांवरील वाढत्या अत्याचारामुळे पुसली जाण्याची भीती निर्माण झाली आहे. राज्यात प्रत्येक दोन तासात एक बलात्कार होतो. तर रोज ३४ अबलांचा विनयभंग केला जात असल्याचे विदारक सत्य समोर आले आहे. त्याचप्रमाने छेडछाड व हुंडाबळींच्या गुन्याचा आलेखही वाढत आहे. महिलांवरील उपाय योजना कमी पडत असल्याचे दिसून येत आहे. हे पुढील सारणीवरून लक्षात येईल. .

**सहा वर्षातील महिलांवरील अत्याचार : — सारणी**

| वर्ष | बलात्कार | विनयभंग | छेडछाड | हुंडाबळी |
|---|---|---|---|---|
| २०१४ | ३४३८ | १०००१ | १५७५ | २७९ |
| २०१५ | ४१४४ | ११७१३ | १११९ | २६८ |
| २०१६ | ४१८९ | ११३९६ | ९२४ | २४८ |
| २०१७ | ४३५६ | १२२३८ | ८६४ | २३४ |
| २०१८ | ४९७३ | १४०६६ | ९६० | २१४ |
| २०१९ | ५४१२ | १३६१७ | १०३३ | १८७ |
| एकूण | २६,५१२ | ७३,०३१ | ६,४७५ | १४३० |

स्त्रोत. लोकमत न्यूज पेपर फरवरी २०२०.

**महिला अत्याचारावर विचारवंतांच्या** (भूमिका) **प्रतीक्रीया :**

महाराष्ट्राच्या अनेक जिल्ह्यांमध्ये महिलांवर जे अत्याचार झालेत त्यासंदर्भात समाजातिल काही वेगवेगळ्या क्षेत्रातील विचारवंतांनी आपल्या प्रतिक्रीया द्यायला सुरूवात केली होती. त्यामध्ये राजकीय, सामाजिक, आर्थिक, शैक्षणिक, व न्यायदान करनाऱ्या आणि कलावंत या वेगवेगळ्या क्षेत्रातील मान्यवरांनी आपले विचार व्यक्त केलेले आहेत. महाराष्ट्राची प्रतिमा कलंकीत करणाऱ्या एकापाठोपाठ एक तीन घटना घडल्या एकतर्फी प्रेमातुन हिंगणघाटला एका प्राध्यापीकेला भररस्त्यात पेट्रोल टाकून पेटविण्यात आले. त्यानंतर औरंगाबादच्या सिल्लोड तालूक्यातील अंधारलेल्या घरात महिला एकटी आहे हे पाहिले आणि तिने प्रतीकार करताच रॉकेल टाकून पेटवून दिले., तर मुंबईतील काशिमीरा भागात बलात्काराचा गुन्हा मागे घेण्यासाठी एकीच्या अंगावर ज्वलनशील पदार्थ टाकून तिला जाळण्याचा प्रयत्न झाला. महाराष्ट्रासाठी या तीनही घटना लज्यास्पद आहे. याच संदर्भात विचारवंताच्या प्रतीक्रीया पुढील प्रमाणे —

**डॉ. अंजली साळवे (माजी समुपदेशक)** ही घटना अत्यंत खेदजनक आहे. भररस्त्यावर ही घटना झाली, प्रथमदर्शीच आरोपीला लोकांनी बघीतले आहे आणि असे आरोपी मानवाधिकार कक्षेतून बाहेर असायला पाहिजे. अशी प्रकरने एक महिण्यात निकाली काढून आरोपीस सार्वजनीक स्थळी फाशी व्हावी जेनेकरून असे गुन्हे करतांना लोकांना जबर बसेल तसेच अत्याचारग्रस्त महिलेला ताबडतोब वैद्यकीय मदत ,उपचार व नुकसानभरपाई मिळावी,अशी कायद्यात सुधारना व्हावी.

**विद्या चव्हाण (आमदार रा. कांग्रेस)** त्या म्हणतात की, महिलांवरील अत्याचाराचे प्रमाण दिवसेंदिवस वाढत आहे. याला आळा घालण्यासाठी कठोर कायदे करण्यात आले मात्र, त्याची अंमलबजावणी होत नसल्याने गुन्हेगारी प्रवृत्ती वाढत आहे. निर्भया हत्याकांडातील आरोपीला फाशीची शिक्षा झाल्यानंतरही वारंवार तारीख बदलविली जात आहे. त्यामुळे देशात कायद्याचा धाक राहिला नाही. इतकेच नव्हे तर , पोलीस प्रशासन आणि न्याय व्यवस्थेवरही प्रश्नचिन्ह निर्माण होत असल्याचे मत राष्ट्रवादी कांग्रसच्या प्रदेश प्रतीनीधी आमदार विद्या चव्हान यांनी पत्रपरीशदेत व्यक्त केले.

**नीलम गोऱ्हे ( उपसभापती, वि. प.)** म्हणतात एकंदर समाजात हिंसक प्रवृत्ती घडून येत असल्याचे दिसून येत आहे.उन्नाव येथील बलात्कार प्रकरनात पीडीतेला मारून टाकण्यात आले. या घटनेनंतर एक प्रकारची लाट आल्याचे दिसून येते. त्यात पीडीतेलाच संपविले की संपूर्ण साक्षी पुरावेच संपून जातात. आणि त्यातून आपली सुटका होईल ही भावना गुन्हेगाराची असते. महिला अत्याचाराच्या घटनेमध्ये माध्यमांची तसेच स्त्रीयांच्या समस्येसाठी झटणारे कार्यकर्ते , संस्थांची जबाबदारी मोठी आहे. विविध प्रकारच्या अत्याचारांना बळी पडलेल्या महिलांना साथ द्यायला पाहिजे. अशा प्रकरनांमध्ये सत्र न्यायालयात न्याय मीळाला, तरी न्यायालयातील प्रक्रिया शिल्लकच असते सत्र न्यायालयात ते सर्वोच्च न्यायालयापर्यंतची न्यायाची प्रक्रिया जलद आणि सुलभ होण्याची आवश्यकता असते.

**यशोमती ठाकूर (महिला व बालकल्यान मंत्री महा. रा.) पेटवणाऱ्या हातांना चांगले संस्कार द्या.**

शाहू — फुले आंबेडकरांचा महाराष्ट्र शीवरायांचा,सावीत्रीचा,आणि संतांचा महाराष्ट्र आज संपूर्ण महाराष्ट्राचा पराभव झाल्यासरखे वाटले. बराच वेळ डॉक्टरांशी चर्चा केली, तिचं वाचण आणि पुन्हा सामान्य जीवन जगणं माझ्यासाठी खूप आवश्यक आहे. ऐक मंत्री म्हणून नव्हे , तर एका मुलीची आई म्हणून. मी माझ्या मुलांना नेहमी सांगते, महिलांचा सन्मान करा. आज या प्रकरणाच्या अनुशंगाने महाराष्ट्रातल्या तमाम आयांना मला पुन्हा एकदा सांगायच आहे, आपल्या मुलांना एकदा हिंगणघाट, औरंगाबाद आणि मीरा रोड, मुंबई आणि

देशातील काणाकोपऱ्यातील अत्याचारीत, पीडीत महिलांच दु;ख सांगा, त्यांना शिकवा, मुली, स्त्रीयांना नाही म्हणण्याचा अधिकार आहे. आणि तो त्यांनी मान्य केला पाहिजे. स्त्री ही तुमच्यासारखीच एक स्वतंत्र मनुष्यप्राणी आहे. तिला फक्त शरिर नाही., मन आहे बुद्वी आहे. तिला तीचा मार्ग निवडण्याचा अधिकार आहे. तमाम आयांना माझं हेही सांगणं आहे, मुलींच्या– बायकांच्या वागणं पेहराव यावरून त्यांच्या चारीत्र्यावर शिंतोडे उडवू नका. कदाचीत आपला मुलगा यातुनही काही तरी शिकत असेल. मुलांना समजले पाहीजे की, स्त्रीवर अधिकार गाजवनं चुकीचं आहे. हिसा करने, जीवे मारने, जाळून मारणं, ॲसीड फेकणं याला प्रेम म्हणत नाही. समाजानेही सजगपणे आपल्या आसपास होणाऱ्या छेडछाडीच्या घटनांनबाबत बोललं पाहीजे. महिलांसाठी एक सुरक्षित वातावरन निर्माण करणं हे आपलेच कर्तव्य आहे. ज्या समाजातील मुली सुरक्षित तो समाज पुढारलेला माणला जातो. आपलं पुढारलेपण आज संकटात आहे. समाजात असे माथेफीरू निर्माण होणार नाही असा प्रयत्न करू. अशा घटना होवू नये म्हणून जे काही शक्य असेल, ते सरकार म्हणून आम्ही करूच एक आई म्हणून माझी महाराष्ट्रला हात जोडून विनंती आहे की, आपल्या मुली अशा रस्त्यावर पेटणार नाहीत, याची काळजी घ्या. पेटवणाऱ्या हातांमध्ये आपल्याच उदरातुन जन्माला आलेला मुलगा नसावा म्हणून या हातांना चांगले संस्कार द्या.

**निशिगंधा वाड, अभिनेत्री** – मुंबई : गेल्या काही दिवसांत महिलांवरील अत्याचार वाढले आहेत. माध्यमांमुळे या घटनांना वाचा फुटत असून लोकप्रतिनीधी, महिला त्यासाठी भूमिका घेत आहे. इतकच नव्हेतर, पीडीतेच्या पाठीसी समाजही उभा रहात आहे. ही सकारात्मक बाब आहे. मागील काही काळात स्त्रियांना विचार स्वातंत्र्य आल्यामुळे आता त्या स्वतंत्र व्यक्ती म्हणून ठामपणे भूमिका घेत आहे. कोणतीही तमा न बाळगता आपले विचार मत मांडत आहे. कोणत्याही विषयावर बोलण्याचे धारीष्ट दाखवित आहे. अत्याचाराविरूद्ध न्याय देणे ही केवळ शासनाची जबाबदारी नाही. घरापासून जबाबदारीचे शिक्षण द्यायला हवे.

**दिलीप वसंत सहस्त्रबुद्धे, सोलापूर** : म्हणतात, कायद्याची अंमलबजावनी न होने दरिंगाई, पक्षपात व अडवनूक अंमलबजावनी यामुळे समाजात असंतोष वाढत आहे. यामुळे कोणालरही दायद्याचा धाक राहीला नाही. यातूनच केवड महिलांवर नव्हे तर सर्व क्षेत्रात अत्याचार वाढत आहे. आणखी असे की, सध्याच्या मालीका व चित्रपट यामधून अपवर्तनाचे सविस्तर चित्रीकरन करून दाखविले जाते. हे सर्व लहान थोर बघतात यामुळे याचा परीनाम अपवर्तन करू इच्छिणाऱ्या व्यक्तीच्या मेंदुवर होतो. यातूनच अशा वाईट घटना समाजात करण्याचे धाडस करतरत.

**वैशाली कडू पाटील औरंगाबाद** : पुरोगामी महाराष्ट्रात एकापाठोपाठ एक अमानवी घटना घडत आहे. हे रोखण्यासाठी समाजातीनल प्रत्येक घटकाने पुढे आले पाहीजे. केवळ पोलीसांद्धारेच या घटना थांबविल्या जातील असे म्हणता येणार नाही. आरोपीला ३० दिवसाच्या आत कठोरातील कठोर शिक्षा झाली पाहीजे. न्यायालयात पुरावे सुनावण्यात वेळ जातो. हा वेळ कमी करण्यासठी सर्व पातळीवर प्रयत्न करणे गरजेचे आहे. त्याशीवाय नराधमांना जरब बसणार नाही. विशेषत: युवकांचे समुपदेशन केले पाहीजे. महिलांच्या सुरक्षेसाठी एक चळवळ उभी राहीली पाहीजे. तरच अत्याचार थांबतील.

**भाग्यश्री शिंदे, कोल्हापूर, म्हणते** : स्त्रीकडे भोगवस्तू म्हणून पाहणे थांबवा.आपण २१ व्या शतकात जगतो आहे. तरी मुली खुले पणाने समाजात वावरू शकत नाही. हे अत्यांत खेदजनक आहे. पाठलाग करणं, अष्लिल बोलणं,नकार आला कीतिला त्रास देणं आणि भररस्त्यात जाळणे ही विकृती आहे असे मला वाटते. मुलांना नकार पचविणे शिकविने गरजेचे आहे. सिनेमा, मालीकांमध्ये स्त्रीदेहाचे होणारे उदात्तीकरन आणि

केवळ भेगवस्तू म्हणून पाहणे या पुरूषी मानसिकतेतुन मुलांनी बाहेर यायला हवे.

**ॲड. स्मिता सिंगलकर, नागपूर त्या म्हणतात, पुरुषांमध्ये जागृतीची खरी गरज आहे :** एकतर्फी प्रेमातुन हल्ला झाला असे सांगण्यात येते. पण हेच कारण नाही दोन्हीकडून असलेले प्रेम किंवा पतीपत्नीमधील वादविवाद, यामध्ये अत्याचार हा स्त्रीलाच सहन करावा लागतो. प्रेम ही एक भावना आहे आणि ती व्यक्त करण्याचा किंवा नकार देण्याचा अधिकार स्त्रीला आहे.पण तीचा नकार पचविण्याचे भाण किंवा ताकद पुरूषांमध्ये नसल्याचे दिसून येते. स्त्रीने प्रेम व्यक्त केलेतर चरित्रहीन आणि नकारदिला तर तीच वाईट. या प्रवृत्तीला छेद देण्याची गरज आहे. संविधानाने मानव म्हणून स्त्री आणि पुरूषाला समान अधिकार दिले आहे. पण तीचे अधिकार नाकारण्याचेच काम होत असलेले दिसून येते. त्यामुळे महिलांची सुरक्षा, सक्षमीकरन, किंवा फास्ट ट्रॅक कोर्टात प्रकरणाची सुनावनी करून आरोपींना शिक्षा करण्यासोबतच पुरूषांच्या माणसीकस क्षमिकरणाची खरी गरज निर्माण झाली आहे. स्त्रीचा आदरकरण्याचे शिक्षण शालेयस्तरावरून देण्याची गरज आहे. तसेच महिलांची लहानात लहान तक्रार पोलीसांनी गंभीरतेने घेण्याची गरज आहे. कारण याच लहान गुन्हाचे रूपांतर मोठ्या गुन्यातही होउ शकते.म्हणून पीडीत मुलीच्या शारीरिक आणि मानसीक सक्षमतेसाठी उपाय करने गरजेचे आहे.

**सारिका कुलकर्णी म्हणतात कायदे तातडीने कडक करा :** आपला देश २१व्या शतकाकडे वाटचाल करत असतांना देशात अनेक जटील प्रश्न सोडविले जात आहे. ३७० वे कलम करुन कित्येक वर्षाचा काश्मीर प्रश्न सोडविला आहे. तलाकचा कायदा बदलविला जातो. पण महिलांवरील अत्याचार कमी करण्यासाठी कायद्यात आवश्यक बदल केले जात नाहीत. कायद्याचा धाक उरला नाही न्यायालयीन लढाई जलद गतीने होत नाही. त्यामुळे आरोपींचे धाडस वाढत आहे. त्याकरीता कायदे कठोर करने आवश्यक आहे.

**स्नेहलता देशमुख (माजी कुलगुरु मुंबई विद्यापीठ) :** माध्यमांनी संवेदनशीलता जपावी. महिलांवरील वाढत्या अत्याचाराच्या घटनांवर नियंत्रन येंण्यासाठी कठोर कायद्याची गरज आहे. मात्र त्याहुन अधिक गरज आहे ती समाजाची माणसीकता बदलण्याची. समाजात भरदिवसा महिलांवर अत्याचार होत आहे. महाविद्यालयातीलही विद्यार्थीनाही असुरक्षीत असल्याचे दिसुन येत आहे. सोशल मीडीयासारख्या माध्यमातूनही अशा घटनोची नोंद होत आहे. त्या समाजासमोर येत आहे. त्यावर कार्यतात्परता दाखवून वेळीच कार्यवाही होत आहे.

**सोनिया बी. जाधव म्हणतात**, न्यायालयीन दिरंगाई चिंताजनक आहे असे त्यांचे मत आहे. आपल्या देशाची न्याय व्यवस्था इतकी संथ गतीची आहे की, तारीख पे तारीख होत असते, साक्षीदार आला नाही म्हणून तारीख वाढली जाते,कोर्टाच्या सुटया इंग्रजाच्या काळापासून कालबाह्य झालेल्या नाही. न्यायालयाला खसमस, दिवाळी, उन्हाळयांच्या सुट्या या सुट्यांची काय गरज आहे. वेळेनुसार दियम बदलले पाहीजे, मग फास्ट टॉग कोर्टाची गरज भसणार नाही.कालमर्यादेत निकाल लावण्याची गरज आहे.म्हणुन हैद्राबादमध्ये झालेल्या एन्काउन्टरला लोकांनी डोक्यावर घेतले. जबर कायदे असले पाहिजे. नुसत्या कायद्याला लोकांनी घाबरले पाहिजे. पोलीसांचा धोच उरला नाही, तर पोलीसांनाच मारून बदमाश पसार होतात. मग असहाय्य स्त्रियांची काय गत राहील. त्याकरीता प्रत्येक आईने आपल्या मुलांना लहान वयापासूनच चांगले संस्कार करने गरजेचे आहे. लोकमत ९फेब्रुवारी २०२०

वरील सर्व प्रतीक्रीया महिलांवरील अत्याचारा संदर्भात महिलांनी नोंदविलेल्या प्रतिक्रीया आहेत. यावरून असा निष्कर्श निघतो की,

**निष्कर्ष :**

वरील संशोधनावरून काही निष्कर्ष पुढीलप्रमाणे मांडलेले आहेत.

१. महिला अत्याचारात दिवसेंदिवस वाढ होत असलेली दिसून येते. याचे कारण म्हणजे महिलांच्या परीचयातीलच व्यक्ती संधी साधून तीचा गैरफायदा घेत आहे. याचे प्रमाण महिला अत्याचारामध्ये सर्वाधिक आहे. म्हणजेच ओळखीच्या व्यक्तीकडून अत्याचार होत आहे.

२. ज्या मुलांवर आई–वडीलांचे नियंत्रन नाही, तसेच मुलांवर योग्य संस्कार झालेले नाही , अशीच मुले महिलांवर अत्याचार करीत असलेले या संशोधनातून दिसून येते.

३. समाजात महिलांच्या संदर्भात अनेक कायदे आहेत, परंतु त्या कायद्याची अंमल बजावनी योग्य प्रकारे होत नाही. न्यायालयाचा वेळखावू पणा हे आरोपीला दिलासा देणारी बाब आहे. म्हणून न्यायालयाकडून लवकरात लवकर न्याय देवून आरोपीला शीक्षा व्हायला पाहीजे.

४. अनेक विचारवंतांनी महिलांच्या संदर्भात आपले विचार व्यक्त केले, यापैकी बरेचसे लोक राजकारणात आहे. हे सर्व मंडळी संसदेमध्ये बसून कायदे बनवू शकतात. आणि देशातील महिलांना त्वरीत न्याय देवू शकतात. केंद्रातील सरकारने ३७० वे कलम रद्द करून देशात नवा इतिहीस घडवीला. त्याचप्रमाने महिलांच्या संदर्भात ठोस निर्णय घेवून नविन इतिहास घडविला पाहिजे. तेव्हांच खऱ्या अर्थाने महिलांना न्याय मिळेल.

**उपाययोजना :**

महिला अत्याचार रोखण्यासाठी समाजातील लोकांनी तत्पर असायला पाहीजे. न्यायालयांनी कोणतीही दप्तर दिरंगाइ न करता ताबडतोब निर्णय लावायला पाहीजे. तसेच पोलीस विभागाने लवकर चौकशी करून न्यायालयात दस्ताऐवज सादर करायला पाहिजे. स्त्रियांनी परीचयातील व्यक्ती पासून सावध असले पाहीजे. आईवडीलांनी मुलांवर चांगले संस्कार करावे.

**संदर्भ :**


- डॉ.बी. एम. कऱ्हाडे – भारतीय समाज प्रश्न आणि समस्या, पिंपळापुरे अंण्ड कं. नागपूर
- प्रा. व्ही. बी. पाटील – मानवी हक्क, के' सागर पब्लिकेशन्स,पुणे,२०१२.
- लोकमत , दि. २,३,फेब्रुवारी २०२०
- लोकमत ५, ६ फेब्रुवारी २०२०
- लोकमत ९ फेब्रुवारी २०२०.